साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490
# गोदावरी परिवार

सवलतीचा पोष्ट रजि. नं. JAL/120/2022-2024

* वर्ष २५ वे * अंक ५० * सोमवार ०९/१२/२०२४ * डाक ११/१२/२०२४ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 50 * monday : 09 / 12 / 2024 * post Dt. 11/ 12 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.




# ५३ वर्षीय रूग्णाच्या मानेच्या मणक्यावर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ञांचे यश

**जळगाव - खाटेवरून कोसळल्याने मानेच्या मणक्याला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे मणक्याची अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ञांनी यशस्वी केली आहे. या शस्त्रक्रियेमुळे रूग्णाच्या मानेची हालचाल आता पूर्ववत झाली आहे.**

याबाबत माहिती अशी की, बोदवड तालुक्यातील मुक्तळ येथील माणिक शेळके (वय ५३) हे शेती करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवितात. शेतात काम करून घरी आल्यानंतर रात्री खाटेवर झोपतांना अंदाज न आल्याने ते खाली कोसळले. यात त्यांच्या मानेला गंभीर दुखापत झाली. मानेतील पाच आणि सहा क्रमांकाचा मणका सरकल्याने त्यांच्या हातापायाची ताकदही कमी झाली. त्यामुळे शरीराची हालचाल करणे त्यांना शक्य होत नव्हते. अशा परिस्थितीत त्यांना डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी मेंदू व मणका विकार तज्ञ डॉ. विपूल राठोड यांनी माणिक शेळके यांची तपासणी केली. त्यांच्या मानेचा एमआरआर आणि सीटी स्कॅनही केला. त्यात मानेतील मणके सरकल्याचे एंटेरोलिस्थेसिस असल्याचे निदर्शनास आले. अखेर त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. मानेला झालेली गंभीर दुखापत लक्षात घेता ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची आणि जोखमीची देखिल होती. मात्र मेंदू व मणका विकार तज्ञ डॉ. विपूल राठोड यांनी अनुभव आणि कौशल्य पणाला लावत फ्युजन ३६० ही शस्त्रक्रिया करण्यात आली. तब्बल चार तास ही शस्त्रक्रिया चालली. शस्त्रक्रियेनंतर अवघ्या तिसऱ्याच दिवशी त्यांच्या हातापायाची ताकद पूर्ववत होऊन त्यांच्या मानेचीही हालचाल होऊ लागली. या शस्त्रक्रियेसाठी मोठा खर्च लागतो. मात्र डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपलब्ध असलेल्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत माणिक शेळके यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. अर्शिल शेख, डॉ. अपुर्वा, डॉ. अर्पिता, डॉ. सतीश, डॉ. शितल आणि डॉ. बी.आर. सोनवणे यांनी सहकार्य केले.


रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

माणिक शेळके यांच्या मानेच्या मणक्याला मार बसल्यामुळे जबर दुखापत झाली होती. त्यांच्या मानेतील मणके सरकल्याने हातापायात कमजोरी आली होती. त्यामुळे आवश्यक त्या तपासण्या करून त्यांच्यावर फ्युजन ३६० ही शस्त्रक्रिया करण्यात आली. अशा परिस्थितीत शस्त्रक्रिया न केल्यास रूग्ण कायमचा अंथरूणाला खिळण्याची शक्यता असते. मात्र शस्त्रक्रियेमुळे रूग्णाच्या शरीराची हालचाल आता पूर्ववत झाली आहे. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात ही शस्त्रक्रिया योजनेंतर्गत मोफत करण्यात आली आहे.

-डॉ. विपुल राठोड
वैद्यकीय तज्ञ



# फ्रोजन शोल्डरच्या समस्येकडे दुर्लक्ष करू नका!

**जळगाव : खांद्यामध्ये तीव्र वेदना आणि कडकपणा या समस्येला फ्रोझन शोल्डर म्हणतात. फ्रोझन शोल्डरच्या बाबतीत, एखाद्या व्यक्तीला खांद्यामध्ये वेदना आणि कडकपणाच्या समस्येचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्या भागातील कामे पूर्णपणे थांबतात. अशा परिस्थितीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील अस्थिरोग तज्ञांचा सल्ला घ्या असे आवाहन करण्यात आले आहे.**

ज्या लोकांना फ्रोझन शोल्डरची समस्या आहे, त्यांच्या खांद्यावर वाईट परिणाम होतो. अशा परिस्थितीत त्या लोकांना खांद्याशी संबंधित कोणतेही काम करणे कठीण होते. ब्रश करणे, केस विंचरणे, गाडी चालवणे इत्यादी छोटी कामेही करता येत नाहीत. या सर्व गोष्टी करत असताना खांद्यामध्ये तीव्र वेदना होतात आणि हात उचलणे कठीण होते. काहीवेळा फ्रोझन शोल्डर इतका गंभीर असू शकतो की बाधित व्यक्ती पूर्णपणे काम करू शकत नाही आणि आपली कामे पार पाडण्यासाठी त्याला इतरांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. खांद्याचा सांधा आणि त्याच्या सभोवतालच्या पेशींना खांदा कॅप्सूल म्हणून ओळखले जाते. फ्रोझन शोल्डरच्या बाबतीत, खांद्याच्या कॅप्सूलमध्ये सूज येते. सूज झाल्यामुळे, खांद्याच्या कॅप्सूल कठोर आणि जाड होतात. तीव्र वेदनांमुळे खांद्याशी संबंधित कोणतेही काम करणे कठीण होते. खांद्यामध्ये वेदना किंवा कडकपणा, रात्री वेदना जाणवणे आणि वारंवार जाग येणे, हात खांद्यावर किंवा पाठीकडे वळवताना खूप वेदना जाणवणे अशी फ्रोझन शोल्डरची लक्षणे आहेत.

# जन्मजात बालकांच्या हृदयातील छिद्रावर उपचाराची सुविधा

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयरोग तज्ञांकडून ३२५ शस्त्रक्रिया

**जळगाव : जन्मत:च बालकांच्या हृदयात असलेल्या छिद्रावर आता डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या हृदयालयात खात्रीशीर उपचार केला जात आहे. आत्तापर्यंत ३२५ हून अधिक बालकांवर अशा प्रकारची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत.**

हृदयालयात जन्मजात बालकांच्या हृदयात असलेल्या छिद्रामुळे अनेक समस्या निर्माण होतात. या आजाराचे वेळीच निदान होणे आवश्यक असते. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या हृदयालयात अशा आजाराच्या अनेक बालकांवर शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत. ३२५ बालकांवर आत्तापर्यंत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहे. कॉर्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. वैभव पाटील, डॉ. हार्दिक मोरे, डॉ.मोहीत, डॉ. ललीत, डॉ.निखील अशी तज्ञ डॉक्टरांची टीम उपलब्ध आहे.



# न्युमोनियाग्रस्त दोन बहिणींवर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात यशस्वी उपचार

**जळगाव - एरंडोल तालुक्यातील उरण येथील तकारी कुटूंबातील दोन बहिणींना झालेल्या न्युमोनियावर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ञांकडून यशस्वी उपचार करण्यात आले. या उपचारामुळे दोन्ही बहिणींची प्रकृती आता ठणठणीत झाली आहे.**

याबाबत माहिती अशी की, एरंडोल तालुक्यातील उरण येथील मायरा तकारी (२ महिने) आणि मसीहा तकारी (दीड वर्ष) या दोन्ही बहिणींना अचानक ताप आला होता. तसेच त्यांना सर्दी, खोकला आणि कफ देखिल झाला होता. दोन्ही बहिणींना स्थानिक रूग्णालयात दाखल केले असता त्यांना जळगाव येथे हलविण्याचा सल्ला देण्यात आला. तकारी कुटूंबियांनी दोन्ही बहिणींना डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या पीआयसीयू विभागात दाखल केले.

याठिकाणी बालरोग तज्ञ डॉ. उमाकांत अणेकर यांनी दोन्ही बहिणींची तपासणी केली असता त्यांच्या छातीचा एक्स-रे काढण्याचा सल्ला दिला. छातीच्या एक्स-रे मध्ये फुफ्फुसात न्युमोनिया असल्याचे निदान करण्यात आले. न्युमोनियामुळे दोन्ही बहिणींना श्वास घेण्यालाही त्रास होत होता. त्यामुळे त्यांना तातडीने कृत्रीम श्वासोच्छवास लावण्यात आला आणि उपचारही सुरू करण्यात आले. दहा दिवसांच्या उपचारानंतर दोन्ही बहिणींची प्रकृती ही धोक्याबाहेर आली. दोन्ही बहिणींच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्यांना रूग्णालयतून सुटी देण्यात आली. दोन्ही बहिणींवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्यात आले. उपचारासाठी निवासी डॉ. कुशल धांडे, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर यांनी सहकार्य केले.



सध्या हिवाळ्याचे दिवस असून तापमानाचा पारा घसरत आहे. त्यामुळे लहान मुलांना सर्दी, खोकला, ताप याचे प्रमाण वाढत आहे. सर्दी, खोकल्याकडे दुर्लक्ष केल्यास न्युमोनियाची शक्यता अधिक असते. त्यामुळे बालकांची वेळीच तपासणी करून न्युमोनियाचे निदान करणे गरजेचे आहे. न्युमोनिया हा आजार सध्याच्य परिस्थितीत अनेकांमध्ये आढळून येतो. फुफ्फुसामध्ये न्युमोनियाचे प्रमाण अधिक झाल्यावर रुग्ण धावपळ करतात. वेळीच वैद्यकीय तज्ञांचा सल्ला घेऊन आजाराचे निदान केल्यास हा आजार पूर्णपणे बरा होतो.

-डॉ. ओमश्री गुडे,
निवासी डॉक्टर



## संपादकीय

# आत्मचिंतनाची गरज

बदला घेण्याची गोष्ट करणार नाही, मी जनतेपुढे नतमस्तक आहे, अशी संयत भूमिका घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विजयाच्या अत्युच्च क्षणीही उन्माद दूर सारला. एकीकडे असे परिपक्व चित्र असताना विरोधी पक्षनेत्यांचे काय सुरू आहे? त्यांनी पराभवाची जबाबदारी घेतली काय? सध्या तरी तसे चित्र नाही ! ईव्हीएमवर दोषारोपण करीत आत्मपरीक्षणापासून पळ काढणारी महाविकास आघाडी जनतेला दिसते आहे. अपयश तसेही पोरके असते. काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शप) यांच्या महाविकास आघाडीला निकालांनी जोरदार धक्का दिला.आघाडीच्या प्रचारातही समन्वय नव्हता. काँग्रेस-शिवसेना यांच्यातील द्वंद्वाचा जागर होत राहिला. संघटित महायुती विरोधात गाफील विरोधी पक्ष असे दृश्य दिसले. लोकसभेत यशश्री देणारे मुद्देच पुन्हा धावून येतील या भ्रमाने महाविकास आघाडीला जबर धोका दिला. अपयशाची जबाबदारी स्वीकारण्यात होणारी त्यांची टाळाटाळ गंभीर आहे. 'परिवर्तनाचे पर्व, बहुजन सर्व' असा घोष काही काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारात झळकला. मराठा समाजाच्या नाराजीचा सामना भाजपला सोसावा लागेल, अशी शक्यता होती. मनोज जरांगे पाटील यांच्या मराठवाड्यातील प्रभावक्षेत्रातही ती फार जाणवली नाही. लोकांपर्यंत पोहोचायचे असेल तर सामान्यांमधील एक व्हावे लागेल, ही बाब फडणवीसांनी ओळखली. त्यातूनच 'देवेंद्रजी' ते 'देवाभाऊ' हा सामान्यांच्या जवळ नेणारा बदल त्यांनी स्वीकारला. सत्ताधारी असे आमूलाग्र बदल असतानाही 'लोकसभेच्या पराभवानंतर अवघ्या पाच महिन्यांत कोणती करामत तिन्ही पक्षांनी केली,' असा प्रश्न उद्धव ठाकरे करीत राहिले.परिश्रमांमध्ये उणे न ठरण्याचे अंगभूत कसब महायुतीच्या तिन्ही नेत्यांमध्ये आहे. हे पद्धतशीर सायास महाविकास आघाडीकडून दुर्लक्षित राहिले. महायुतीने विविध जाती-जमातींच्या महामंडळांची संख्या चांगलीच वाढवत नेली. यात अगदी रामोशी, वडार यासारख्या दुर्लक्षित घटकांपासून थेट ब्राह्मण समाजाचाही अंतर्भाव त्यांनी करून घेतला. आधीच महामंडळाचा एकत्रित तोटा ५० हजार कोटींवर गेला असल्याने काही मंडळे बंद करावीत हे 'कॅग'ने लक्षात आणून दिले होते. विरोधी पक्षांनी याकडे संयत लक्ष वेधण्याचे कष्टही घेतले नाहीत. प्रचारातील अशा चुका स्वीकारण्याचे मोठेपण महाविकास आघाडीने आता दाखवायला हवे.संजीवक भरारी घेण्यासाठी चुका शोधाव्या लागतात. चुकांचा शोध घेण्यासाठी एकत्र यावे लागते. विरोधकांनी सखोल आत्मपरीक्षण करावे. सत्ताधाऱ्यांनीही विरोधी पक्षनेतेपद देऊ करून लोकशाहीची बूज राखावी. शेवटी 'लोकशाहीजीवी' राहण्यातच भारतीयांचे हित आहे.

# पलक झंवर लिखित पलको से खुली कल्पनाये कविता संग्रहाचे प्रकाशन

**जळगाव – पलक झंवर लिखित पलको से खुली कल्पनाये ह्या कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास गोदावरी फौंडेशन चे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ उल्हास पाटील, डॉ वर्षा पाटील,भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ केतकी ताई पाटील ह्यांनी उपस्थित राहून पलक ला शुभेच्छा दिल्यात.**

तिचा हा पहिलाच कविता संग्रह असून दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण कविता त्यात समाविष्ट आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जैन उद्योग समूहचे अध्यक्ष अशोक भाऊ जैन, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू विजय माहेश्वरी, किड्स गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल च्या प्रिन्सिपल मीनल जैन हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी जवाहरलाल झंवर, लीलावती झंवर, डॉ भूषण झंवर, प्रिया झंवर यांच्यासह शहरातील डॉक्टर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# राज्यस्तरीय ॲग्रोवर्ल्ड प्रदर्शन उपयुक्त; महिला शेतकऱ्यांसह बचत गटांचा सन्मान



**जळगाव – शहरातील एकलव्य क्रीडा संकुलावर राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन ॲग्रोवर्ल्ड २०२४ अंतर्गत जिल्ह्यातील महिला शेतकरी व महिला बचत गटास पारीतोषिक वितरण करण्यात आले.**

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर खासदार स्मिताताई वाघ, आत्मा चे प्रकल्प संचालक अनिल भोकरे, पाचोरा येथील मधूकर दादा पाटील, ॲग्रोवर्ल्ड चे शैलेंद्र चौहान हे उपस्थित होते. सर्वप्रथम प्रातिनिधिक स्वरूपात काही स्टॉल्स ला भेट दिली तसेच संवाद साधला. या प्रसंगी उपस्थित महिलांशी मनोगताद्वारे संपर्क साधला. प्रदर्शनाचे यंदाचे ९ वे वर्ष असून शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणारे असेच आहे. पुरस्कार्थींच्या प्रत्येकाच्या यशोगाथेत संघर्ष हा कायमच असल्याचे दिसून आले. कौटुंबिक जबाबदारी सांभाळून महिला आज स्वतःची ओळख निर्माण करीत आहे, त्यामुळे प्रत्येक महिलेचा सन्मान झालाच पाहिजे, हा पुरस्कार त्यांना आणखी प्रगती करण्याचे बळ देणाराच आहे, अ

से सांगून ॲग्रोवल्ड प्रदर्शनास शुभेच्छा दिल्यात. २ डिसेंबर पर्यंत प्रदर्शन सुरु राहणार असून नागरिकांनी आवर्जून भेट द्यावी. प्रदर्शन स्थळी गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीर भरविण्यात आले आहे, त्याचाही लाभ घ्यावा. यावेळी जळगाव जिल्हासह विविध ठिकाणाहून मोठ्या प्रमाणावर नागरिक भेट देत आहे. तसेच शेतीतुन विविध उत्पादन वाढीसाठी चर्चासत्र आयोजित केली जात आहे. त्यासही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

# जामठी,लोहारा येथे आरोग्य तपासणी

**जामठी, लोहारा – डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाचे आरोग्य अभियान जामठी व लोहारा येथे पोहच. जामठी येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात तर लोहारा येथे ग्रा.प कार्यालयात नागरिकांची तपासणी केली.**

डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात नेत्ररोग तज्ञ,मेडीसिन, सर्जरी, अस्थीरोग आणि त्वचारोग विभागातील डॉ.ओमप्रकाश, डॉ. शुभम आणि डॉ. अंकीता या तज्ञांनी १८९नागरिकांची तपासणी केली.





# बेटावदात भरला आरोग्याचा मेळा

**बेटावद, ता. बोदवड – ग्रा.प कार्यालय बेटावद ता बोदवड येथे शिबिराच्या माध्यमातून आरोग्य मेळयाचे आयोजन करण्यात आले.**

डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात नेत्ररोग तज्ञ,मेडीसिन, सर्जरी, अस्थीरोग आणि त्वचारोग विभागाच्या डॉ. ओमप्रकाश, डॉ.शुभम फावडे, डॉ.जतीन,डॉ.नरेंद्र या तज्ञांनी ७८ नागरिकांची तपासणी केली.यातील १८ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याचे सांगून उपचाराबाबत मार्गदर्शन केले.




# यावल व लोणीत आरोग्य जनजागृती

यावल,लोणी – येथील ग्रा.प कार्यालयात तपासणी शिबिराच्या माध्यमातून आरोग्य जनजागृती राबवण्यात आली.ग्रा.प कार्यालयात डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात नेत्ररोग तज्ञ,मेडीसिन, सर्जरी, अस्थीरोग आणि त्वचारोग विभागातील डॉ.ओमप्रकाश, डॉ. शुभम आणि डॉ. अंकीता या तज्ञांनी २८९नागरिकांची तपासणी केली.यातील ३५ नागरिकांना पुढील उपचाराची गरज असल्याचे सांगून उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण संस्थेत २९ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**पाल – दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण संस्था, पाल व गोदावरी फाउंडेशन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय रकतपेढी जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिवस व मुंबई येथे दहशतवादी हल्यात शहीद झालेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना श्रद्धांजलीनिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.**

**रक्तदान शिबिरामध्ये २९ रक्तदात्यांनी केले रक्तदान. यात २४ वनरक्षक प्रशिक्षणार्थी, संस्थेतील २ महिला, व ३ अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.**




रक्तदान शिबीर संस्थेचे आदरणीय संचालक हेमंत शेवाळे, श्रीमती. अंजली बोरावाल, उपसंचालक.डॉ. अतुल लाडवंजारी, वैद्यकीय अधिकारी. धनराज कासार सर, से.नि.गृहप्रमुख बापूराव केदार, श्रीमती. माधुरी रल, अमोल परदेशी, दादाभाऊ पवार, अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. रक्तपेढीचे डॉ.नितीन भारंबे, रक्तपेढी समन्वयक. लक्ष्मण पाटील,शेख सईद, गणेश पाटील, भावेश शेळके यांनी परिश्रम घेतले.

# अकोला येथे २२३ रूग्णांना शिबीराचा लाभ

अकोला – येथे डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातर्फे घेण्यात आलेल्या आरोग्य शिबीराचा २२३ जणांनी लाभ घेतला आहे. या शिबीरात तपासणीसाठी सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती.




डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या विविध तज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यात हृदयविकाराचे ६, नेत्रविकार २०, मेडीसीन ३, अस्थिरोग १५, कान-नाक-घसा ४, शस्त्रक्रिया ९ आणि स्त्रीरोग १ असे एकूण ५६ जणांना रूग्णालयात भरती होण्याचा सल्ला देण्यात आला आहे. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातर्फे ग्रामीणसह शहरी भागात सुरू असलेल्या आरोग्य शिबीरांना उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे. तसेच या आरोग्य शिबीरांच्या माध्यमातून अनेक रूग्णांना उपचाराची दिशा मिळत आहे. त्यामुळे हे आरोग्य शिबीर नवसंजीवनीच ठरत आहे.

Editor : Sourabh Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सौरभ पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पिटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## गोदावरी नर्सिंग कॉलेजमध्ये

# तीन दिवसीय संशोधन पद्धती कार्यशाळेचा समारोप

**जळगाव: गोदावरी नर्सिंग कॉलेज, जळगाव,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय मूलभूत संशोधन पद्धती कार्यशाळेचा यशस्वी समारोप २८ रोजी झाला.**



ही कार्यशाळा २६ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत पार पडली.कार्यशाळेचा उद्देशपदव्युत्तर विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना संशोधन प्रक्रियेतील कौशल्ये विकसित करणे आणि शैक्षणिक प्रगतीस चालना देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. या तीन दिवसांत संशोधन प्रश्नांची मांडणी, संशोधन रचना, डेटा संकलन, सांख्यिकीय विश्लेषण आणि वैज्ञानिक लेखन या महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.सत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शनया कार्यशाळेत नर्सिंग आणि आरोग्य विज्ञान क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.पहिला दिवस: डॉ. सुरेश पोढाडे आणि डॉ. विपिन तोंगळे यांनी संशोधनाचा मूलभूत पाया स्पष्ट केला.दुसरा दिवस: डॉ. मिलिंद कांबळे आणि डॉ. राजेश कोलारकर यांनी संशोधन रचना आणि डेटा संकलन प्रक्रियेची सखोल माहिती दिली.तिसरा दिवस: डॉ. सुनील आर. पाटील आणि डॉ. विलास मालकर यांनी सांख्यिकीय विश्लेषण व वैज्ञानिक लेखनावर विस्तृत सत्र घेतले.प्रमाणपत्र वितरण व समारोप समारंभकार्यशाळेच्या समारोप सत्रात सहभागी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी गोदावरी नर्सिंग कॉलेज व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. नर्सिंग क्षेत्रातील संशोधन आणि शैक्षणिक प्रगतीला चालना देण्याच्या वचनबद्धतेचे गोदावरी नर्सिंग कॉलेजचे हे आणखी एक पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. जसनीत दया, प्रा. निर्भय मोहन, प्रा. सुनिता मीरपगारे आणि प्रा. शिल्पा वाघमारे यांनी विशेष मेहनत घेतली.कार्यशाळेच्या शेवटच्या सत्राचा समारोप कार्यक्रमाच्या योगदानाबद्दल सर्व सहभागींचे कृतज्ञता व्यक्त करून मनापासून आभार मानण्यात आला. या सत्राने कार्यशाळेदरम्यान मिळालेले ज्ञान, कौशल्ये आणि बनावट कनेक्शन यावर विचार करण्याची संधी दिली. आभार प्रदर्शनानंतर, कार्यशाळा पूर्ण करण्याचे निकष यशस्वीपणे पूर्ण करणार्या सहभागींना अभ्यासक्रम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ही प्रमाणपत्रे कार्यशाळेच्या उद्दिष्टांमध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी त्यांच्या समर्पण, वचनबद्धता आणि यशाची मूर्त ओळख म्हणून काम करतात. कार्यशाळेच्या यशस्वी समारोपाचे प्रतीक, सहभागी आणि आयोजक दोघांसाठी हा अभिमानाचा आणि कर्तृत्वाचा क्षण होता

## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथी

**जळगाव: येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात महात्मा फुले पुण्यतिथीनिमीत्त अभिवादन करण्यात आले.**

आज, २८ नोव्हेंबर २०२४ रोजी, गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक सुधारणा कार्यावर विचारमंथन केले.महात्मा जोतिबा फुले यांनी महिलांचे आणि मुलींचे शिक्षण, शेती सुधारणा, जातिव्यवस्थेचे उच्चाटन, तसेच विधवा आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी केलेले कार्य यावर विशेष चर्चा झाली. त्यांचे विचार आणि योगदान आजच्या सामाजिक प्रगतीसाठी प्रेरणादायी आहेत.

संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन केले आणि समाजाच्या उन्नतीसाठी कार्यरत राहण्याचा संदेश दिला.




## गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात रेड रिबिन क्लबची स्थापना



**जळगाव – जागतिक एड्स डेच्या निमित्ताने गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS), मेडिकल सर्जिकल नर्सिंग विभाग, कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभाग, यूथ रेड क्रॉस आणि रेड रिबिन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयात रेड रिबिन क्लबची स्थापना करण्यात आली.**

कार्यक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी एड्स जनजागृतीसाठी, बाबत स्किट सादरीकरण केले, आकर्षक पोस्टर प्रदर्शन आणि रांगोळी काढून आपले सर्जनशील कौशल्य दाखवले.

कार्यक्रमात प्राचार्य विशाखा गणवीर यांनी विद्यार्थ्यांना जागतिक एड्स डेच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन केले. डॉक्टर उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक (मेडिकल सुपरिंटेंडेंट) प्रेमचंद पंडित , दिपाली पाटील, प्रतिभा चौधरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वेळी प्रा. अश्विनी वैद्य, प्रा. मनोरमा कश्यप, प्रा. निम्मी वर्गीस, प्रा. डॉ. प्रियदर्शनी मून आणि प्रा. निर्भय मोहोड , शिक्षक वृंद यांचीही विशेष उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना एड्ससंदर्भात जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाय, आणि त्यासंबंधीच्या शासकीय योजनांची सखोल माहिती देण्यात आली. रेड रिबिन क्लबच्या माध्यमातून भविष्यात एड्सशी संबंधित जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि समाजहिताच्या दृष्टीने उपयुक्त ठरला.

## गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये

# संविधान दिनानिमित्त युवा संसदचे आयोजन

**जळगाव –२६ नोव्हेंबर २०२४: गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये आज संविधान दिनाच्या निमित्ताने युथ पार्लमेंट चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना भारतीय संसदीय प्रणालीची ओळख करून देणे आणि त्यांच्यात लोकशाही मूल्ये रुजविणे होते.**



कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर शाळेचे प्राचार्य सौ. नीलिमा चौधरी यांनी संविधान दिनाचे महत्त्व विषद केले. विद्यार्थ्यांनी लोकसभेच्या सत्राचे यथार्थ सादरीकरण केले, ज्यामध्ये पंतप्रधान, विरोधी पक्षनेते, खासदार, तसेच सभापतींच्या भूमिकांमध्ये त्यांनी स्वतःला सादर केले.सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रीय व सामाजिक विषयांवर चर्चा केली आणि ठराव मांडले. महिलांचे सक्षमीकरण, शैक्षणिक सुधारणा, आणि पर्यावरण संरक्षण यांसारख्या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी ठाम भूमिका मांडल्या. युथ पार्लमेंटला उपस्थित असणार्या सर्व शिक्षक वर्गांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना संविधानाचे मूल्य समजून घेण्याचे आवाहन केले.शाळेच्या व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांच्या सहभागाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक केले. युथ पार्लमेंटसारखा उपक्रम प्राचार्य सौं. नीलिमा चौधरी यांच्या प्रेरणे मुळे साध्य झाला व तो साध्य करण्यासाठी स्कूलचे शिक्षक विजय पाटील व तुषार मेढे यांनी योगदान दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर व लोकशाही प्रक्रियेबद्दल समज विकसित झाली. युथ पार्लमेंट हा एक प्रेरणादायी अनुभव ठरला, असे मत उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केले.युथ पार्लमेंटमुळे विद्यार्थी अधिक जबाबदार नागरिक होण्याच्या दिशेने प्रेरित होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.




## गोदावरी नर्सिंगमध्ये २०१६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांची अल्युमनी मिट संपन्न

**जळगाव: गोदावरी नर्सिंग कॉलेजमध्ये २०१६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांची अल्युमनी मिट नुकतीच संपन्न झाली. या कार्यक्रमाला २०१६ बॅचच्या दीक्षा धनविजय आणि कृतिका धमादे यांनी विशेष उपस्थिती लावली.**

या मिट दरम्यान, माजी विद्यार्थ्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला व आपल्या अनुभवांचा आदान-प्रदान केला. २०१६ पासून २०२४ पर्यंतच्या कार्यकाळात कॉलेजमध्ये झालेल्या विकासाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाच्या भौतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक प्रगतीबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त करत आपल्या आठवणींना उजाळा दिला.अल्युमनी मिटने महाविद्यालय आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये एक स्नेहपूर्ण नाते निर्माण करण्यास हातभार लावला. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

* Be determined, and relentless in your pursuit of success.
* Learn and stay updated on trends and emerging technologies.
* Be able to generate and recognize ideas that can help solve problems.
* Prioritize tasks, set deadlines and create daily routine.
* Take initiative and risk and use resources to take advantage of opportunities.
* Request input to gain outside perspective on your qualities.
* Be come visionaries with courage to craft resonant purpose and boldly pursue the future.

* सफलता की अपनी खोज में दृढ़ रहें और अथक रहें।
* प्रवृत्तियों और उभरती प्रौद्योगिकियों पर सीखें और अपडेट रहें।
* समस्याओं को हल करने में मदद कर सकने वाले विचारों को उत्पन्न करने और पहचानने में सक्षम हों।
* कार्यों को प्राथमिकता दें, समय सीमा निर्धारित करें और दैनिक दिनचर्या बनाएं।
* अवसरों का लाभ उठाने के लिए पहल करें और जोखिम लें और संसाधनों का उपयोग करें।
* अपने गुणों पर बाहरी परिप्रेक्ष्य प्राप्त करने के लिए इनपुट का अनुरोध करें।
* अनुनाद उद्देश्य तैयार करने और साहसपूर्वक भविष्य का पीछा करने के लिए साहस के साथ दूरदर्शी बनें।

## डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयास

# आयएपीएसएम,आयपीएचएचे अध्यक्ष,सचिवांची भेट

जळगाव – डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयातर्फे पुढील जानेवारी २०२५ महिन्यात १६ ते १८ तिन दिवसीय आयएपीएसएम या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असून, या धर्तीवर डॉ. उल्हास पाटील महविद्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



आयएपीएसएम आणि आयपीएचएचे अध्यक्ष आणि सचिवांसह पदाधिकाऱ्यांनी आज डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. यावेळी या पदाधिकाऱ्यांनी परिषदेची तयारी व नोंदणी यांची माहिती जाणून घेत पुढील तयारीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले व पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी (आयपीएचए)चे अध्यक्ष डॉ. प्रसाद वायंगणकर, आयएपीएसएमचे सचिव डॉ. हर्षल पाणवे, एआयपीएचचे सचिव डॉ. किस्मतराव, डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. एन. एस. आर्विकर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, प्रशासन अधिकारी प्रमोद भिरुड, डॉ. निलेश बेंडाळे, डॉ. प्रशांत गुडेट्टी, डॉ. भवानी राणा यांच्यासह कर्मचारी व प्राध्यापक उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना त्यांनी परिषदेची पुढील रुपरेषा तसेच कामाचे स्वरुप आणि निमंत्रण व ईर्र सोयीसुविधा याबाबत सविस्तर चर्चा करुन आवश्यक त्या सूचना आयोजकांना केल्या.

प्रारंभी मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचेवतीने अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके यांनी पुष्पगुच्छ देवून केले.

# २६ वर्षीय युवकावर एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी शस्त्रक्रिया यशस्वी

## डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय रूग्णालयातील तज्ञांच्या प्रयत्नांना यश

जळगाव - धारणी जि अमरावती - येथिल २६ वर्षीय मुकेश चव्हाण युवकास गेल्या काही महिन्यापासून पोटदुखी, उलटी,अशा विविध समस्यांनी त्रस्त होवून ब-हाणपूर येथे गेला परंतू निराश होवून जळगावच्या डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयात तपासणीस आला.

येथे सर्जरी तज्ञ डॉ. चैतन्य पाटील यांनी त्याचा इतिहास व रीपोर्ट बघून रूग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. तपासणी दरम्यांन रूग्णास पोटात वेदना तर जाणवत होत्या पण रक्तदाबही कमी होत असल्याचे डॉ. चैतन्य पाटील यांना लक्षात आले. एक दिवस पुर्ण लक्ष ठेवून त्यांना स्टेबल करून शस्त्रक्रिया करण्यासाठी घेतले.दरम्यान काही चाचण्या केल्यानंतर असे लक्षात आले की रूणांच्या सिक्कल परफोशन येथे छिद्र होते तसेच अपेन्डीक्सची सूजही होती.डॉ. चैतन्य पाटील यांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. ही अत्यंत किचकट व दुर्मिळ शस्त्रक्रिया एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी पध्दतीने करून अपेन्डीक्सची सूज काढण्यात तसेच सिक्कल परपोशन प्रायमरी क्लोजर करण्यात यश आले.



यानंतर रूग्णाला २ दिवस अतिदक्षता विभागात व नंतर वार्डमध्ये काळजीपुर्वक उपचार करून घरी पाठवण्यात आले.शल्यचिकीत्सा विभाग प्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. चैतन्य पाटील यांना भुलरोग तज्ञ डॉ. बी आर सोनवणे, डॉ.किरण जोगावडे ,डा. आशिष बावनकर यांनी सहकार्य केले.

### एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी का केली जाते?

एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमीचा प्राथमिक उद्देश तीव्र ओटीपोटात दुखण्याचे कारण ओळखणे हा आहे आणि एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी सामान्यत: केवळ आपत्कालीन परिस्थितीत किंवा इतर कमी आक्रमक पद्धतींनी निदान यशस्वी न झाल्यानंतर केली जाते. एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमी अनेकदा उपचारात्मक प्रक्रियेत रूपांतरित केली जाऊ शकते. जेव्हा संशय येतो तेव्हा एक अन्वेषणात्मक लॅपरोटॉमी केली जाते. ओटीपोटात रक्तस्त्राव, ओटीपोटात संसर्ग, ओटीपोटाच्या अवयवांना दुखापत आतडी किंवा कोलन छिद्र, आतड्यांसंबंधी अडथळा, उदर पोकळीमध्ये गॅस्ट्रिक सामग्रीचे संकल एक्टोपिक गर्भधारणा,एंडोमेट्रिओसिस, अपेंडिसाइटिस, डिम्बग्रंथि कर्करोग किंवा हॉजकिन रोग स्टेज करण्यासाठी इतर कारणांसाठी देखील एक अन्वेषण लॅपरोटॉमी केली जाऊ शकते.



डॉ. चैतन्य पाटील
शल्यचिकीत्सक

# सामान्य पोटदुखीकडे दुर्लक्ष करू नका!

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ञांचा घ्या सल्ला

**जळगाव - पोटदुखी ही एक सामान्य समस्या आहे, ज्याचा सामना जवळजवळ प्रत्येकालाच होतो. बहुतेकदा ही वेदना सौम्य असते आणि काही काळानंतर स्वत:हून निघून जाते. परंतु, कधीकधी ही वेदना गंभीर आजारांचे लक्षण देखील असू शकते. जर तुम्हाला वारंवार पोटदुखी होत असेल किंवा हे दुखणे तीक्ष्ण, सतत किंवा असह्य असेल तर ते हलके घेऊ नका, डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ञ डॉक्टरांचा त्वरीत सल्ला घ्या असे आवाहन करण्यात आले आहे.**

सामान्य पोटदुखी भविष्यात मोठे आजाराचे लक्षण ठरू शकते. यात अपेंडिसाइटिस: अपेंडिक्स हा पोटाच्या उजव्या खालच्या भागात स्थित एक लहान अवयव आहे. जेव्हा ते सूजते तेव्हा पेन्डिसाइटिस होतो. अपेंडिसाइटिस ही एक गंभीर स्थिती आहे ज्यावर शस्त्रक्रियेने उपचार केले जातात. वेळेवर उपचार न केल्यास ते प्राणघातकही ठरू शकते. गैस्ट्रिक अल्सर: गैस्ट्रिक अल्सर जेव्हा पोटात किंवा आतड्यात अल्सर तयार होतो तेव्हा हा अल्सर पोटाच्या आतील भागात जखमेचे रूप धारण करतो. पोटदुखी, आंबट ढेकर येणे, उलट्या होणे, भूक न लागणे इत्यादी गैस्ट्रिक अल्सरच्या लक्षणांचा समावेश होतो.

**पित्ताशय :** पित्ताशयातील खडे हे गॉल ब्लैडरात तयार होणारे छोटे खडे असतात. हे दगड गॉल ब्लैडरातून पित्ताचा प्रवाह रोखू शकतात, ज्यामुळे तीव्र वेदना, ताप, उलट्या इत्यादी लक्षणे उद्भवतात.

**आतड्यांमध्ये जळजळ:** क्रोहन रोग हा एक आजार आहे जो पचनसंस्थेवर परिणाम करतो. या आजारात आतड्यांमध्ये सूज येते, त्यामुळे पोटदुखी, जुलाब, वजन कमी होणे, थकवा येणे आदी लक्षणे दिसतात.

# पायाला मुंग्या येताय? आजच करा तपासणी

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात सुविधा उपलब्ध

**जळगाव- रेस्टलेस लेग्ज सिंड्रोम ही एक न्यूरोलॉजिकल स्थिती आहे जी जन्मापासून वृद्धापकाळापर्यंत कोणालाही अनुभवता येते. यामध्ये, व्यक्तीला अस्वस्थता, मुंग्या येणे, खाज सुटणे किंवा पाय हलवण्याची तीव्र इच्छा जाणवते, विशेषत: रात्री ही समस्या अनेकदा झोपणे कठीण करते आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम करते. अशा परिस्थितीत त्वरीत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील न्युरोलॉजी तज्ञांचा सल्ला घ्या.**

रेस्टलेस लेग सिंड्रोमची लक्षणे प्रौढ आणि मुलांमध्ये बदलू शकतात, परंतु काही सामान्य लक्षणांमध्ये हे समाविष्ट आहे. रात्री किंवा जेव्हा तुम्ही शांतपणे बसता तेव्हा तुम्हाला तुमच्या पायांमध्ये अस्वस्थता



जाणवते. अस्वस्थता किंवा किंचित खाज सुटल्यासारखे वाटू शकते, ज्यामुळे पाय हलवण्याची इच्छा निर्माण होते, पाय हलवण्याची अनियंत्रित इच्छा, विशेषत: रात्री, तुम्हाला तुमचे पाय हलवण्याची तीव्र इच्छा असते, यामुळे तुम्हाला झोप येणे कठीण होऊ शकते.

मुंग्या येणे आणि वेदना होणे :

काही लोकांना त्यांच्या पायांमध्ये जळजळ, मुंग्या येणे किंवा वेदना झाल्याची भावना येते, ज्यामुळे त्यांच्या झोपेत व्यत्यय येतो. रात्री लक्षणे वाढणे:रेस्टलेस लेग सिंड्रोमची लक्षणे सहसा रात्री किंवा झोपण्यापूर्वी खराब होतात. दिवसा ही लक्षणे कमी होऊ शकतात, परंतु जसजशी रात्र वाढते तसतसे पायांमध्ये अस्वस्थता वाढते.

ही लक्षणे संभाव्य धोके दर्शविणारी आहे. त्यामुळे डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ञांकडून आजच सल्ला घ्यावा असे आवाहन रूग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# व्हेरीकोज व्हेन्सच्या २१५ रूग्णांवर लेझरद्वारे उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात तंत्रज्ञान उपलब्ध

**जळगाव - व्हेरीकोज व्हेन्ससाठी आता कुठल्याही शस्त्रक्रियेची गरज नसून लेझर किरणांद्वारे उपचाराचे तंत्रज्ञान खान्देशात एकमेव डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपलब्ध झाले आहे. आत्तापर्यंत २१५ रूग्णांनी या तंत्रज्ञानाचा लाभ घेतला आहे.**

पाय दुखणे, पायावर सूज येणे, पायावर जखम होणे, रक्तवाहिनी फुटून रक्तस्त्राव होणे, पाय कुरूप दिसणे, पायावर चट्टे पडणे, पाय काळे पडणे, पायाला खाज सुटणे अशी साधारणत: व्हेरीकोज व्हेन्सची लक्षणे आहेत. व्हेरीकोज व्हेन्सचे निदान झाल्यानंतर त्याच्यावर शस्त्रक्रियेचा सल्ला दिला जातो. आता मात्र शस्त्रक्रिया न करता लेझर किरणांद्वारे उपचार करणे सहज शक्य झाले आहे. खान्देशात एकमेव डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात लेझर किरणांद्वारे व्हेरीकोज व्हेन्सवर उपचार केले जाणार आहेत. या सुविधेचा माजी खा. डॉ. उल्हास पाटील व कु. सारा पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला आहे. पहिल्याच दिवशी सात रूग्णांवर या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार करण्यात आले आहे.

**लेझर किरणांद्वारे उपचाराचे फायदे**

लेझर किरणांद्वारे केलेल्या उपचारामुळे कमी वेळ लागतो व रूग्णाला केवळ एक दिवसच रूग्णालयात भरती रहावे लागते, शस्त्रक्रियेच्या तुलनेत कामावर लवकर रूजू होता येते, व्रण रहित व बिनटाक्याचे उपचार होतात, सुरक्षित, प्रभावी आणि वेदनारहीत अशी ही उपचार पध्दती असून त्याचे उत्तम वैद्यकीय परिणाम मिळतात.



### अशी आहे तज्ञ डॉक्टरांची टीम

व्हेरिकोज व्हेन्सच्या रूग्णांवर उपचार करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत असून इंटरव्हेशनल रेडिओलॉजिस्ट डॉ. राजकिरण राठी यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ. गीत कटारीया, डॉ. रमेश इंगळे, डॉ. महेश मुरमे, डॉ. आशुतोष पंडीत ही टीम उपलब्ध राहणार आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव, विज्ञान मेळाव्याची सांगता

जळगाव - सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत जिल्हास्तरीय युवा महोत्सव व विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विज्ञान मेळा, लोकगीत, लोकनृत्य, कविता लेखन, कथा लेखन, मोबाईल फोटोग्राफी, चित्रकला व भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेते आणि १० युवा आयकॉन विभागीय स्तरावर जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत. युथ आयकॉनची निवड ऑनलाइन पद्धतीने केली जाणार आहे.

युवा उत्सवाचे उद्घाटन जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, डॉ.सुहास गाजरे, प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.भूषण चौधरी, संचालक घउखखड, सोना कुमार, मुख्याध्यापक केंद्रीय विद्यालय, रवींद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी आणि नरेंद्र डागर, जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र, जळगाव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. रवींद्र नाईक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर नरेंद्र डागर यांनी युवकांना माय भारत आणि विकसित भारत प्रश्नमंजुषाविषयी मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी देखील कार्यक्रमात भाग घेतला आणि विज्ञान मेळाव्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचा आढावा घेतला. तरुणांना संबोधित करताना त्यांनी विविध



महाविद्यालयातील तरुणांशी संपर्क साधण्यासाठी नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि विकसित भारत २०४७ ची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्यासाठी प्रोत्साहित केले. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व परीक्षकांचा सत्कारही केला.

# दुचाकी वाहनांकरिता नविन नोंदणी क्रमांकाच्या मालिकेस सुरुवात

**जळगाव - उप प्रादेशिक परिवहन कार्यालय परिवहन संवर्गातील दुचाकी वाहनांची नवीन नोंदणी एमएच-१९/ईएन-०००१ ते ९९९९ पर्यंतची मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे.**

ज्या वाहन धारकांना आपल्या नविन वाहनांकरीता आकर्षक किंवा पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करावयाचा असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक ०५ व ०६ डिसेंबर २०२४ रोजी अर्ज दुपारी ४.०० वाजेपर्यंत जमा करायची आहे. तसेच पसंती क्रमांकाच्या अर्जासोबत अर्जदाराने क्रमांकानुसार विहित केलेल्या शासकीय शुल्काचा राष्ट्रीयकृत बँकेचा डीडी (ऊऋ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव यांच्या नावे) तसेच वाहन ज्यांच्या नावाने नोंदणी करावयाचे आहे, त्यांचा पत्ता पुरावा व आधारकार्डशी सलग्न मोबाईल क्रमांक सादर करणे बंधनकारक असणार आहे.

दिनांक ०५व ०६ डिसेंबर रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. दिनांक ०६ डिसेंबर रोजी अर्जाची छाननी करण्यात येणार आहे. दिनांक ०६ डिसेंबर रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयात एका क्रमांकसाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास एका पेक्षा जास्त अर्ज आलेल्या क्रमांकाच्या बाबतीत ०९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वाढीव शुल्काचा धनाकर्ष स्वतंत्र बंद लिफाफ्यातून सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

बंद लिफाफे हे ०९ डिसेंबर रोजी ५ वाजता सहाय्यक /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या समक्ष उघडण्यात येतील व जास्त रकमेचे धनादेश सादर केलेल्या अर्जदारास सदर क्रमांक देण्यात येईल व उर्वरित धनादेश संबंधितांना परत करण्यात येतील.